# अजूनही देठ हिरवा



तग धर मित्रा, जप अंतरीचा ओलावा
अजूनही देठ तुझा हिरवा

ह्या वृक्षावर आपण अंकूरलो, बहरलो,
वृक्षाचं वैभव बनलो
किरणांच्या किमयेतून निर्मिली हरीत् रंगणावळ
सातत्यानं पुरवली वृक्षाला सत्वशील हिरवळ
वाढत्या वृक्षाचं वाढवलं बळ

केलं, वृक्षानही आपलं कौतुक केलं
त्याचं जीवन शोषू दिलं, वा-यावर डोलू दिलं
पण आतां त्याला हवीय
नव्या देठांवर फुटणारी नवी पालवी
त्याला वाटतं जुनी पानं गळावी
त्यांची तहान का जिरवावी?

आता आपण वृक्षाचं जीवन विसरावं
आपलं आपणच पाहावं
धुक्या दवांत अंग ओलवावं, तग धरून राहावं
मित्रा, जप उरला सुरला ओलावा
सोबतीला देठ राही हिरवा

-- विजय पाठारे